# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal
Volume : II Issue : II July to Sep.- 2018



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

# अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Effect Of Effluents Of Sugar Factory On Ground Water Quality | Shri. Choudhari V. G. | 1 |
| 2 | INDIAN IMAGES IN NISSIM EZEKIEL'S POETRY | Dr.Subhash S. Waghmare | 5 |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar Important Suggestion for Reservation for Sheduled Castes and Adivasi Tribes | Prakash Kharat | 8 |
| 4 | MODES OF IRRIGATION IN BEED DISTRICT, A GEOGRAPHICAL STUDY | Mr. Usare Bharat Rupchand, | 11 |
| 5 | Experiment in Engaging men in Gender Equality | Dr. Arundhati Suryakant Patil | 15 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली लोकशाही | प्रा. अरुण पडघन | 18 |
| 7 | मानव संसाधन विकास : सैध्दांतिक विवेचन | फुलारी ज्योती | 22 |
| 8 | बिहारी के दोहो में व्यवहार ज्ञान | डॉ.सविता चोखोबा किर्ते | 27 |
| 9 | डॉ. बी.आर.आंबेडकर: एक वस्तुनिष्ठ इतिहासकार | माळी नितीन वसंतराव<br>प्रा. डॉ. कार्तिक गावंडे | 30 |
| 10 | आपत्ती व्यवस्थापन : आधुनिक काळाची गरज | प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात | 37 |
| 11 | महामानव नेल्सन मंडेला यांचे काव्यरूपाने दिसून येणारे चित्रण | डॉ. दादाराव गुंडरे | 42 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही | प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | 46 |
| 13 | ओतारी समाजाचे लोकजीवन | ओतारी विक्रम अभिमन्यू | 48 |
| 14 | बदलत्या हमावानाचा भारतीय कृषीक्षेआवर परिणाम | प्रा.डॉ. देशमुख एस.बी. | 50 |
| 15 | नव्वदोत्तर स्त्रीवादी काव्य | प्रा. रेखा व्ही. इंगोल | 53 |
| 16 | 'आदिवासींच्या विकास योजना व दिशा "(20 वे शतक) नाशिक | श्री. जी. डी. रुपवते | 58 |
| 17 | माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 60 |
| 18 | चारमीनार एक सुंदर आणि आकर्षक इमारत | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | 64 |
| 19 | आदिवासी लेखकांनी लिहिलेले साहित्य : स्वरुप व विचार | प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी | 66 |
| 20 | अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरी लेखन आशय आणि वेगळेपण काही निरीक्षणे | प्रा. डॉ.धनंजय महादेव होनमान | 69 |
| 21 | लीळाचरित्र : एक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृती | डॉ. सौ. जयदेवी पवार | 75 |
| 22 | वारकरी संप्रदायाची सांस्कृतिक पार्श्वभूमी व संतसाहित्य संशोधनाच्या दिशा | डॉ. बाळासाहेब दास | 78 |

# डॉ. बी.आर.आंबेडकर: एक वस्तुनिष्ठ इतिहासकार

प्रा. डॉ. कार्तिक गावंडे
विभागप्रमुख, इतिहास विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

माळी नितीन वसंतराव
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून इतिहास लेखन परंपरा अनेक वळण घेत नविन प्रवाह निर्माण झालेले आहेत. त्यामुळे इतिहासाची पुर्नमांडणी करावी लागते. वर्तमान बदलले की, गतकाळाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.[१] आतापर्यंत चार विचार प्रवाह इतिहास लेखनात निर्माण झालेले आहेत. १) साम्राज्यवादी इतिहास लेखनांचा प्रवाह २) राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा प्रवाह २) मार्क्सवादी इतिहास लेखनाचा प्रवाह ४) वंचिताच्या इतिहास लेखनाचा प्रवाह. शिवाय आज नव्याने आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह पुढे येत आहे धर्मशास्त्राचा आधार घेवून समाजाच्या बाहेर फेकल्या गेलेल्या समाज घटकांचा अभ्यास या आंबेडकरवादी इतिहास लेखनात करावयाचा आहे.[२]

**पार्श्वभूमी:**

आंबेडकरांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, लोकतांत्रिक, शैक्षणिक विचारवंत म्हणून लेखन झाले आहे. मात्र इतिहासकार असूनही प्रसिद्धीस आलेले नाहीत.[३] आंबेडकरवादी इतिहासलेखन समजून घेण्यासाठी पूर्वी तयार झालेले चार विचारप्रवाह समजून घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय आपणाला आंबेडकरवादी इतिहास लेखनाच्या इतिहास रेखाटनाचे महत्व लक्षात येणार नाही.

**१) साम्राज्यवादी इतिहास लेखनप्रवाह :**

ब्रिटीश लोकभारतात आल्यानंतर खऱ्या अर्थाने साम्राज्यवादी इतिहास लेखनांची सुरुवात झालेली दिसते. त्यांनी वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत रुजविण्यासाठी या प्रकाराला सुरुवात केली. राज्य चालवण्याचा अधिकार आमचा आहे त्यात गैर काही नाही. आम्ही श्रेष्ठ आहोत. या साम्राराज्यवादी दृष्टीकोनातून लेखन प्रकाराची सरुवात झाली. जेम मील, ग्रँड डफ, एल फिस्टन, विल्यम हँटर, जे.टी.व्हिलर इ. साम्राराज्यवादी दृष्टीकोनातून लेखन केले आहे.[४]

**२) राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह :**

१९ व्या शतकाच्या मध्यापासून या इतिहासलेखन प्रवाहाची सुरुवात झालेली आहे. भारतीय लोकांती साक्षरतेचे प्रमाण वाढले. आपल्या इतिहासाविषयीची जागृती निर्माण झाली. तेंव्हा त्यांना वाटू लागले की, आपल इतिहास साम्राज्यवादी दृष्टीकोनांतून लिहिला. तो योग्य नाही. यापेक्षा आपला इतिहास वेगळाच आहे.५ तो कस वेगळा आहे तेंव्हा साम्राज्यवादी इतिहासकारांना उत्तर देण्यासाठी त्यांनी भारतीय संस्कृती, लोक, श्रेष्ठ आहेत दाखवण्यासाठी प्रयत्न केला. या मध्ये काशिप्रसाद अग्रवाल, राजामुकूंद मुखर्जी, जदूनाथ सरकार, रमेशचंद्र बॅनर्जी न्या.रानडे इ. इतिहासकार होते.[६]

**३) मार्क्सवादी इतिहास लेखनांचा प्रवाह :**

या नंतर पाश्चात्य देशात मार्क्सवादी इतिहास लेखनाला सुरुवात झाले. कार्लमार्क्सने आर्थिक दृष्टीकोनातू इतिहासाचे लेखन केले. उत्पन्न, उत्पन्नाची साधने यासाठी वर्ग संघर्ष सर्वांना समान वाटप होण्याची आवश्यकता करिता हा प्रयत्न केलेला दिसतो. यामध्ये इरफान हबीब, रोमिला थॉपर, डि.डि. कौंसबी, बिपिनचंद्र व महाराष्ट्राती कॉ. शरद पाटील इ. इतिहासकार होत.[७]

**४) उपेक्षीताचा/वंचीताचा इतिहास लेखन प्रवाह :**

मार्क्सवादी विचारप्रवाहाच्या नंतर ५० वर्ष लोटल्यानंतर खऱ्या, अर्थाने इतिहास लेखनप्रकारास सुरुवा

झाली. इतिहास लेखनापासून ज्या उपेक्षीतांची उपेक्षा झाली त्याचे लेखन हा उद्देश या विचार प्रवाहाचा होता. हा विचारप्रवाह क्रांतीकारी होता. यामध्ये रणजीत गुहा, सुमित सरकार, शहिद अली इ. इतिहासकार होते. अशाच पद्धतीने आज नव्याने आंबेडकरवादी विचार प्रवाहाची गरज आहे. या इतिहास लेखनाचे वैशिष्ट किंवा वेगळेपण हे आहे की, प्राचीन काळामध्ये इतिहासामध्ये काल्पनिकतेचे प्रचंड आक्रमण झालेले आहे. यातील काल्पनिकता काढून टाकली की, शिल्लक राहिलेले लेखन म्हणजे आंबेडकरवादी इतिहास लेखन होईल.[८]

**५) आंबेडकरवादी इतिहास लेखनांची उद्दिष्टये :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूण ४२ ग्रंथ लिहीलेले आहेत. त्यापैकी १२ ग्रंथ हे निव्वळ इतिहासावर आहेत. तरीही इतिहासकार म्हणून त्यांचा अभ्यास झालेला नाही असे दिसते.

२. प्राचीनकाळ म्हणजे सिंधू संस्कृती पासून दुसऱ्या महायुद्धापर्यंत त्यांनी इतिहासाची चिकित्सा केलेली आहे.

३. एम.ए., पी.एच.डी. चे प्रबंध पाहिल्यावर इतिहासकार म्हणून कोणत्याही अभ्यासकाला मान्यता द्यावीच लागेल.

**गृहितके :**

१) आजपर्यंत समाज सुधारक, अर्थतज्ञ, घटनाकार, राजकीय विचारवंत असे अनेक अंगप्रकाशात आलेले आहेत. मात्र आंबेडकर इतिहासकार म्हणून प्रकाशात आलेले दिसत नाहीत.

२) थोडे ग्रंथ लेखन इतिहासांचे केले. प्रकाशीत झाले की, इतिहासकार म्हणून मान्यता मिळते. आंबेडकरांनी तर १२ निव्वळ इतिहास ग्रंथ लिहिलेले आहेत तरीही ते इतिहासकार म्हणून प्रसिद्ध नाहीत.

३)। विद्यार्थी अवस्थेतील लेखनही ऐतिहासिक दृष्टीकोन दर्शवितात.

**आंबेडकरवाद :**

"स्वांतत्र्य, समता, बंधुत्व व न्याय, यावर आधारित आंबेडकरांच्या विचार प्रणालीचा प्रवाह म्हणजे आंबेडकरवाद होय" शिवाय डॉ. अनिल संगारे यांच्या मते "ब्राम्हणी विचार प्रभावामुळे बहिस्थ केलेल्या समाज घटकाच्या विवेकाच्या आधारे नव्याने निर्लेपपणे इतिहासाची मांडणी करणे म्हणजे आंबेडकरवाद होय."[९]

**आंबेडकरवादी इतिहास लेखनाची वैशिष्टये :**

इ.सन पूर्व ६ व्या शतकामध्ये गौतम बुद्धाने बौद्ध धर्माची स्थापना केली व प्रस्थापीत धर्माच्या विचाराच्या विरोधात पाहिले बंड केले. चार आर्य सत्य, आर्य आष्टांगीक मार्ग, पंचशिल, त्रिरत्ने, मध्यममार्ग, इ. तत्वज्ञान जगासमोर ठेवले. परिणामी सदवर्तणूक ठेवल्यास ईश्वर कल्पना मान्य करण्याची गरज नाही. असा संदेश दिला. मानवी भवितव्य हे विचार व प्रणालीवर आवलंबून आहे हे सांगितले. कबीरानी गौतम बुद्धाची प्रेरणा घेऊन पुढे ही प्रेरणा महात्मा फुलेंनी घेतली. म्हणजेच ब्राह्मण्यांच्या वर्चस्वातून ब्राम्हणेतरांना कसे सोडवावे हे सांगितले.[१०]

**आंबेडकरांच्या इतिहास लेखनांची वैशिष्टये :**

**१. निरिश्वरवाद :** जवळपास इतर सर्व धर्म कुठल्याही विकास कार्यात ईश्वराला विकास कार्यात प्रथम स्थान देतात. मात्र गौतम बुद्धाचा प्रभाव आंबेडकर लिखानात दिसून येतो. ईश्वरापेक्षा कर्तव्याला महत्व देतात.

**२. परिवर्तन :** आंबेडकर म्हणतात, इतिहास प्रक्रिया स्वभावानुसार बदलते. परिवर्तन शिलता हे आंबेडकर इ. लेखनाचे वेशिष्ट आहे.

**३. सरलता :** आंबेडकरांची चळवळ सरळ हेतुने होती, नैतिकता, सत्य न्याय हे चळवळीचे तत्व होते. समाजकारणाचा वापर राजकारणासाठी कधीही केलेला दिसत नाही.

**४. वैचारीक :** आंबेडकर इतिहास लेखनाला वैचारीक बैठक आहे. प्रज्ञा, शिल, कुरुणा व स्वांतत्रता, समता बंधुत्व आणि न्याय लेखन या चळवळीचे वैशिष्टये होते.

५. मानवतावाद : सर्व जनतेला समानतेची वागणूक मिळावी तसेच विषमतेला थारा नाही. बौद्ध धर्मांचा स्विका स्वतः पुरता न करता संपूर्ण समाजाला सोबत घेवून केलेला आहे. यातून मानवतावाद स्पष्टपणे दिसतो.

६. जाती व्यवस्था व अस्पृश्यता उच्चाटन :

१) यासाठी ग्रंथाचे प्रमेय व त्यातील काल्पनिकतेवर आक्रमण केलेले दिसते शेवटी समान वागणूक मिळत नसेल त धर्मात राहुन काम उपयोग म्हणून बौद्ध धर्मांचा स्विकार केला. ब्राम्हणी धर्म व बौद्ध धर्म यांच्या संघर्षातून अस्पृश्यतेचा उदय झाला असे म्हणतात.[११]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर व प्राचीन कालीन इतिहास लेखन :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शुद्र मुळचे कोण व हिंदुस्थानातील कुट प्रश्न ही दोन पुस्तके फार गाजलेली आहेत. त्यातुन इतिहास लेखन विषयक दृष्टीकोन आपणाला स्पष्टपणे दिसून येतो. यातून इतिहास लेखन विषयक दृष्टीकोन आपणाला स्पष्टपणे दिसूनपाचे दिसून येतो. यातुन आपणाला असे चित्र दिसते या इतिहास लेखनात प्रचंड काल्पनिकता आलेली जाणवते. १२ काल्पनिकता जर बाजूला काढली तर आंबेडकरवादी लेखन समोर येईल. शिवाय प्राचीन काळी इतिहास लेखनाचा दृष्टीकोन व उद्देशही तसाच होता. प्रचीन काळात एखादी घटना लोकांच्या समोर ठेवायची असेल तर वर्णनात्मक मांडणी करावी लागत असे.[१३]

आगस्तीकथा :

पूर्वी पर्वतांना पंख होते हे पर्वत पखांच्या साह्याने हवेत उड्डाण करत असे असत, सर्व पूर्वतांचा प्रमुख विंध्य पर्वत होता. तो खट्याळ होता. तो पंखाच्या साह्याने उड्डान करुन मानवी वसाहतीना त्रस्त करुन सोडत असे. तेव्हा सर्व मानवाने एकत्र येवून त्याची तक्रार सर्वाचे गुरु आसणाऱ्या आगस्तीऋषीकडे केली. तेंव्हा आगस्ती ऋषीने त्याला बोलावून समज दिली व तो तेव्हा नतमस्तक झाला. म्हणजे तेव्हापासून पर्वताचे पंख छाटले गेले. असा आशय या कथेचा होता. तेव्हा खरोखरच पर्वतांना पंख असतील का ? तर आपणाला नकारार्थी उत्तर द्यावे लागेल. मग एवढा अट्टहास का ? तर लोकांना एखादी गोष्ट समजून सांगायची असेल तर असे कथानक सांगावे लागे. कारण समाज साक्षर नव्हता. फक्त विंध्य एक माणूस होता. परंतु खट्याळ असला तरी त्यावरती प्रमुखाचे नियंत्रण होते. एवढेच आगस्ती कथेचा उद्देश असला पाहिजे. अगस्ती ही धार्मीक व्यक्ती होती.[१४]

मध्ययुगातही (City of God) इतिहास लेखनाचा केंद्रबिंदू म्हणून इतिहास लेखन झालेले आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून मात्र वस्तुनिष्ठ इतिहास लेखन होत आहे म्हणजे थोडक्यात काळ जसा बदलतो तसा इतिहास लेखनांचा दृष्टकोनही बदलतो. म्हणूनच आज खऱ्या अर्थाने आंबेडकरी इतिहास लेखनाची गरज व महत्व आपणास पटते.

आंबेडकरांनी एकूण ४२ पुस्तकाचे लेखन केले आहे. परंतु १२ पुस्तके तर निव्वळ इतिहासावरची आहेत व त्यांनी इतिहास विषयाची केलेली चिकित्साशास्त्रशुद्ध स्वरुपाची आहे. या शोध निबंधाला शब्दाची मर्यादा आहे. परिणामी सर्व गोष्टी इथे स्पष्ट करणे शक्य नाही. तरी काही घटना उदाहरण म्हणून घेता येतील समाजसुधारक, अर्थतज्ञ, घटनाकार, शिक्षण-तंज्ञ, राजनितीज्ञ इ. अंगानी आंबेडकर मान्यता पावलेले आहेत. मात्र इतिहासकार म्हणून त्यांना पुढे आणणे इतिहास लेखनांचे उद्दीष्टये हवे. त्यामुळे ते दुर्लक्षित आहेत. वंचिताची निश्चित व्याख्या करणे कठीण आहे. म्हणून आंबेडकरवादी इतिहासलेखनांची गरज आहे. उदा.

१. ब्राम्हण व क्षेत्रीय एकत्र आले तर वंचित हे क्षत्रिय ठरतील.

२. ब्राम्हण, क्षेत्रीय, वैश्य एकत्र आले तर वैश्य हे वंचीत ठरतील.

३. ब्राम्हण, क्षत्रिय वैश्य, शुद्र एकत्र आले तर शुद्र वंचीत ठरतील.

४. एकाच वर्णाच्या दोन स्त्रिया एकत्र आल्या मात्र एक विधवा असेल तर विधवा वंचित ठरेल.

हा फरक उपेक्षीत व वंचीतामध्ये करता येईल. म्हणूनच धर्मशास्त्राचा अधार घेवून समाजाच्या बाहेर फेकल्या गेलेल्या घटकाचा अभ्यास आंबेडकरवाद या विचार प्रवाहात येतो. रुग्वेदातील सिद्धांतात एकाच शरीराचे चार भाग दर्शविलेले आहेत. त्या पुरषाच्या मुखातुन ब्राम्हणांचा जन्म बाहू क्षत्रियाचा जन्म पोटातुन - वैश्याचा जन्म - पायातून शुद्राचा जन्म हि काल्पनिकता दिसते. आंबेडकर म्हणतात, एकाच शरीरातुन वर्णव्यवस्थेची निर्मिती होईल का? म्हणजे काल्पनिकता जाणवते हि काल्पनिकता काढली तर आंबेडकर यांच्या दृष्टीकोनातुन लेखन होईल.[१५]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मध्ययुगीन इतिहास लेखन :**

इतिहास लेखनाच्या केंद्र बिंदू मानून लेखन झालेले आढळते. मात्र आंबेडकरवादी इतिहास लेखनाची दृष्टी व चिकित्सा वस्तूनिष्ठ आढळते. दुसऱ्या महायुद्धा पर्यंतची चिकित्सा आंबेडकरांनी केलेली आहे. परंतु सर्वच गोष्टी येथे स्पष्ट करणे शक्य नाही. तरी उदा. म्हणून काही घटनाची आंबेडकरांनी केलेली चिकित्सा लक्षात घेवू.

**छत्रपती शिवाजी महाराज व आंबेडकरवादी इ. लेखन**

१६४६ इ.सन मध्ये रोहिडेश्वरच्या किल्यावर स्वराज्य स्थापनेची शपथ शिवाजी महाराजांनी घेतली. यवनी सत्ते बरोबर संघर्ष केला.[१६] विजयश्री खेचून आणली. मात्र स्वकीयांच विरोध त्यांना पत्कारावा लागला. स्वकीय छत्रपतीचे नेतृत्व स्विकारायला नव्हते. तुम्ही स्वत:ला राजे म्हणविता मात्र आम्ही राजे आहोत असे म्हणत असत. त्यामुळे त्यांना राज्याभिषेक करण्याची गरज होती. मात्र शिवाजी राजे क्षत्रिय नाहीत कारण परशुरामाने २१ वेळ क्षत्रियांना निशान केला तेव्हा क्षत्रिय शिल्लक नाहीत, क्षत्रियच शिल्लक नसेल तर शिवाजीचा राज्याभिषेक कसा करावयाचा प्रश्न निर्माण झाला. वास्तविक पाहता महापुरुषाला कशाचीच गरज नव्हती. ही काल्पनिकता काढून टाकणे म्हणजे आंबेडकरवादी इतिहासलेखन गौरवशाली इतिहासलेखन आहे. शिवाजीने वतनदारी, वैयक्तीक गुणांना संधी दिलेली आहे. धर्मातीत राज्य निर्माण केले.[१८]

जातीप्रथा भक्कम करण्यासाठी ब्राह्मणांनी सतीप्रथा पद्धत सुरू केलेली आहे. ज्यावेळी एखाद्या स्त्रीचा पती मृत्यू पावत असे तेव्हा तिला अमानुष असे जिवन जगावे लागे. जिवंत राहावयाचे असेल तर केशवपण करावे लागे कारण ती सुंदर दिसू नये म्हणून. सुंदर का दिसूनये तर परपुरुषाचे लक्ष तिच्याकडे जावू नये म्हणून सुर्य उदय ते सुर्यास्तापर्यंत ती घरात राहावी, तिला चांगले अन्न द्यावयाचे नाही. कारण याच्या विरूद्ध झाले तर समाजातील व्यक्ती तिच्याबरोबर विवाह करत नसेल व दुसऱ्या जातीतील पुरुष विवाह तिच्याबरोबर करण्यास तयार असेल तर ती करेल. आणि असे जर झाले तर जात नष्ट होईल. तेव्हा जातीव्यवस्थेची प्रथा चालू राहण्यासाठी ही प्रथा चालू केलेली आहे. अशी शास्त्रशुद्ध चिकित्सा आंबेडकरवादी इतिहासलेखनात दिसून येते.[१९]

**अर्वाचीन काळ व आंबेडकरवादी इतिहास लेखन :**

या काळामध्ये इतिहासाकडे पाहण्यांचा दृष्टीकोन बदललेला आढळतो. इतिहास लेखनात वस्तुनिष्ठता आलेली दिसते. त्यामुळे खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी विचारातून लेखन झाल्यास वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध इतिहास समाजासमोर येईल. या काळाबद्दल पूर्णपणे इतिहास आंबेडकरवादी भूमिकेतून मांडणे शक्य नाही. कारण शोध निबंधास शब्दाची मर्यादा आहे. म्हणून काही उदाहरणे आंबेडकरांनी अर्वाचीन काळासंबंधी केलेली चिकित्सेच्या संदर्भात पाहू.

राष्ट्रवाद : राष्ट्रवादाची पारंपारिक व्याख्या 'राष्ट्रवाद ही एक भावना व तिच्यावरचे प्रेम म्हणजे राष्ट्रवाद होय.' डॉ.आंबेडकरांनी केलेली राष्ट्रवादाची चिकित्सा वेगळी आहे. ते म्हणतात, परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त करणारी परंतु स्वयंशासन आणि स्वयंनिर्णयाचे स्वातंत्र्य मान्य करणे म्हणजे राष्ट्रवाद होय. पुढे म्हणतात देशाला स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सैनिकांने कष्ट घेतले असेल तरी स्वयंशासन व दिनदलिताचे स्वयंनिर्णयाचे तत्त्व ते मान्य करीत नसतील तर त्याला राष्ट्रवाद म्हणता येत नाही. समोरचा मुवाबपाहून इतिहासलेखनाचा दृष्टीकोन बदलत नाहीत, देशाचे स्वातंत्र्य

व नागरिकाचे स्वातंत्र्य वेगळे आहे असे म्हणतात.[20]

**महायुद्धासंबंधी आंबेडकरांची चिकित्सा**

१९३९-४२ काळात दुसरे महायुद्ध झाले. इंग्लंड अमेरिकेचा एक गट तर या गटच्या विरूद्ध जर्मनीचा गट या युद्धात समोरासमोर उभा होता. तेव्हा आंबेडकरांनी समाजबांधवांना इंग्लंड अमेरिकेच्या बाजूने लढण्याचा सल्ला दिला कारण असे होते की, जर्मनीच्या बाजूने लढल्यास विजय हुकुमशाहीचा होईल. इंग्लंडविरूद्ध जर्मनी, दोन्ही गट भारतातील नव्हते मग अशी भूमिका आंबेडकरांनी का घेतली ही बाब चिंतनीय आहे.[21]

शिवाय राष्ट्रीय उत्सवापेक्षा समान राष्ट्रीय दुखवटा जास्त राष्ट्रीय भावना निर्माण करू शकतो. उदा.२६/११ मुंबईचा हल्ला व १३/२ चा पूणे बेकरी हल्ला. आंबेडकरवादी लेखन म्हणजे फक्त चळवळी, राज्य घटना नव्हे किंवा धर्मांतर नव्हे तर यापेक्षाही प्रचंड आहे हे घटक फक्त त्यातील काही घटना होत.

आर्य उत्पत्ती बदल भारद्वाज ऋषीने आर्यांची उत्पत्ती इंद्रापासून झाली म्हटले. इंद्रानेच पणी किरात यांना निर्माण केले पण हे पुजा व इंद्राची स्तुती करत नसत म्हणून इंद्रानेच त्याची भूमी आर्यांना दिली नंतर यांनाच अर्यांचे दास म्हटले आहे. स्टॅनले राईस याच्या मताप्रमाणे दोन आक्रमणे भारतात झाली.पहिले द्रविडीयन वंशाच्या लोकाचे त्यांनी मुल निवासी अद्रविडांना जिंकले. हे अद्रविड अस्पृश्य पूर्वज वर्गाचे असून त्यांना अस्पृश्य केले. भारतावर दुसरे आक्रमण आर्य लोकांनी केले आर्यांनी द्रविडांना जिंकले आणि शुद्र बनविले.[22] हे मत आंबेडकरांनी आपल्या विद्वत्तापूर्ण लिहिलेल्या 'द अनटचेबल' या ग्रंथात प्रमाणाद्वारे दाखवून दिलेले आहे.

**आंबेडकरांना विरोध होण्याची पार्श्वभूमी :**

डॉ. बाबासाहेबांनी संपूर्ण दलितांना सन्मानाने वागण्याचे सामर्थ्य निर्माण करून दिले असताना ब्राह्मणांनी विरोध केला तर वावगे वाटण्यासारखे काहीच नाही परंतु स्वकीयानी म्हणजे चर्मकार, ढोर, मातंग यांनी विरोध केला. अस्पृश्य असतानाही हे विशेष वाटते. उदा.आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी केलेल्या चळवळी, पाणवठा, मंदिर प्रवेश इत्यादींना तर मातंग समाजाच्या काही लोकांनी विरोध केला. आम्ही थिअटर मध्ये अमरावती येथे गेलो असताना दर्शनासाठी सह्या घेत आहोत असे म्हटले व सह्या घेतल्या. तेव्हा चालत आलेल्या धर्म परंपरे प्रमाणे वागण्यास तयार आहोत. महार लोकांनी ज्या सह्या घेतल्या त्या खोट्या आहेत.[23]

डॉ.आंबेडकर हे अस्पृश्य जातीचे पुढारी असू शकतील पण चांभार जातीचे पुढारी होवू शकत नाहीत. नारायण काजरोळकर विरोध करीत असत परंतु सहकार्य करणारे शिवतरकरही होते. धर्मातरापर्यंत परंतु शेवटी धर्मांतर होवू शकले नाही. या सर्वांचे कारण ब्राह्मणी विचाराचा व धर्मग्रंथाचा प्रभाव या लोकांवर होता. लोककथा-जातीला धर्मग्रंथांनी जोडलेले दैवी संदर्भ यामुळे लोक येवू शकले नाहीत. आज मात्र परिस्थिती बदललेली आहे व सर्वप्रथम यावर विवेकाच्या आधारे घाव आंबेडकर घालतात. नवीन इतिहास घडवतात मग इतिहासकार का म्हणून मान्यता पवित्र नाहीत. तेव्हा ते निश्चितच वस्तुनिष्ठ इतिहासकार होते.

**डॉ.बाबासाहेबाचे इतिहास लेखनाचे महत्त्व व आंबेडकरवाद :**

इतिहास लेखनातील काल्पनिकता वगळून केलेले लेखन म्हणजे आंबेकरवादी इतिहास लेखन होय. आंबेडकरांनी सर्व अस्पृश्य समाजाला अस्पृश्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना विरोध केला. कारण ब्राह्मणी विचारवादाचा प्रभाव व ग्रंथातील प्रमेय लोककथेचा प्रभाव होय. उदा. म्हणून ढोर समाजाची लोककथा पाहूयात. अशी लोककथा प्रत्येक जातीला जोडलेली आहे. त्यामुळे जातीसाठी माती खावी असा विचार पुढे आलेला आहे.

तारकासुर नावाचा एक राक्षस होता. त्याला भगवान शंकराने वर दिलेला होता. म्हणून मानव व देवही त्याला भित असत. तेव्हा काय करावयाचे अशी बैठक पृथ्वीवर बोलवली तेव्हा कैलास पार्वती महादेवच याचा बंदोबस्त करू

शकतात. तेव्हा सर्वांचा प्रतिनिधी म्हणून अग्निदेवतेला कैलासाला पाठवावयाचे ठरविले. तेव्हा तो कैलासपार्वती महादेवाजवळ गेला. ही गोष्ट कथन केली. तेव्हा तारकासुराच्या बंदोबस्तासाठी त्यांनी विर्य अग्नीदेवतेच्या ओंजळीत टाकले. मात्र अट टाकली की पृथ्वीतलावर जात असताना मागे वळू पाहू नये अन्यथा आपण इच्छित कार्य पूर्ण करू शकणार नाही. हे विर्य घेवून अग्नी पृथ्वीतलावर पोहचला पुढे. मात्र (नदी) गीरी किनारी थांबला तेथे डोहात सप्त अप्सरा (अप्सरा) जलक्रिडा करत होत्या. त्यांनी उबेचा आधार घेतला हिच संधी अग्नीने साधली: उब घेवून डोहात अप्सरा गेल्या तेव्हा त्यांना आपले पोट जड वाटू लागले. शेवटी त्यांना लाज वाटू लागली मग सात पैकी साहा आप्सरांनी आपले दर्भ काढला व तो द्रोणात घालून पाण्यात सोडून दिला तो एका माळयास सापडला व त्यापासून कार्तिक स्वामी तयार झाला. एक अप्सरा मात्र तशीच राहिली ९ महिने ९ दिवसानंतर प्रस्तुत झाली मुलगा झाला पुढे मोठा झाला व वडिलांचे नाव आपल्या आईला विचारू लागला तेंव्हा तीने तु कैलासाला जावून विचार असे म्हटले. तेव्हा तो कैलासाला गेला महादेव-पार्वतीच्या दारात उभा राहिला. तेव्हा त्याला कैलासपती महादेवनी पाहीले व पार्वतीला आज्ञा केली त्याला काही तरी दे (भिकारी समजून) पार्वतीने दारातील सेवकाला त्यासाठी मोहरा देण्यास सांगितले. सुपात मोहरा घेवून येण्यापूर्वी एक ब्राह्मण भिक्षूक आल्यामुळे आपले आसन त्याला दिले व उभा राहिला. मोहरा त्या ब्राह्मण भिक्षुक मिळाल्या मात्र हा तसाच राहिला. कैलासपती महादेवानी एक मुलगा गाय चारण्यासाठी ठेवलेला होता. त्याला कधीही गाईचे दुध वाढू नकोस असे पार्वतीला सुचविले होते. परंतु महादेवाच्या घरी सर्व देवतांना भोजनाचे निमंत्रण होते. तेव्हा हा मुलगाही जेवावयास बसला व त्यालाही दुध वाढण्यात आले. तेव्हा त्याला वाटले गाईचे दुध जर एवढे गोड असेल तर गाय मांस किती गोड असेल. कारण पक्तीला परपुंज करू नये हा नियम होता.

म्हणून त्यांनी जंगलात चारावयास नेलेली गाय उन्हाळीच्या झाडाखाली कापली व ३३ कोटी देवाच्या घरी मासांचे वाटे पाठवून दिले व गाईचे कातडे कैलासपती महादेव यांच्या दारात आणून टाकले. इकडे कैलासपती बाहेर आले तर हा मुलगा उभाच होता. अरे तुला मोहरा देवूनही तु इथेच उभा का? त्यावर त्यांनी ब्राह्मण भिक्षूक आल्यामुळे मी आसन त्याला दिले. मात्र मोहरा त्यालाच दिल्या गेल्या. तेव्हा कैलासपती महादेव म्हणाले की, ज्या तुझे नशिबच तसे आहे. तेव्हा हे कातडे स्वच्छ कर. त्यावर आपला उदरनिर्वाह कर. तेव्हा ईश्वराचा पुत्र म्हणून ढोर समाज पुढे आला. अश्या प्रकारे प्रत्येक जातीला ब्राम्हणी विचारांनी एकदैवी लोककथा जोडलेली आहे. ही काल्पनीकता काढल्यास वास्तववादी इतिहास लेखन होईल.

**निष्कर्ष :**

१. काल्पनिकता जर लेखनातील बाजूला काढली तर वास्तववादी लेखन होईल. हीच काल्पनिकता दूर करण्याचा पहिला प्रयत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला आहे.

२. इतिहासाची नव्याने मांडणी आंबेडकरांनी केलेली आहे. निव्वळ १२ ग्रंथ इतिहासाची संदर्भात आहेत. त्यामुळे ते इतिहासकार होते हा शोध आहे.

३. पीएच.डी., एम.ए.शैक्षणिक प्रबंधही ऐतिहासिक दृष्टीकोन स्पष्ट करतात.

४. ब्राह्मणेत्तर समाजाला ब्राह्मणी जोखडातून सोडवणे आंबेडकरवादी इतिहास लेखनाचे उद्दिष्टये होते.

**उपसंहार :-**

आंबेडकरांनी प्राचीन, मध्ययुग, अर्वाचीन काळाविषयी इतिहासलेखन केलेले आहे. सिंधुसंस्कृती वैदिक संस्कृतीपासून तर दुसरे महायुद्धापर्यंत आणि अत्यंत वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास केलेला आहे. इतिहासलेखनात जो काल्पनिकता आलेली आहे. ती बाजूला सारून लेखन केलेले आहे. परंतु कोणत्या समाजाच्या प्रभावाला बळी न पडता निर्भिडपणे वस्तुनिष्ठ चिकित्सक लेखन केले आहे. या लेखनामुळे समाजसुधारक, घटनाकार, शिक्षणतज्ञ, धर्म अभ्यासक, अर्थतज्ञाबरोबरचते इतिहासकार होते हे समाज विसरला होता. मात्र आता विसरू शकत नाही, ते एक वस्तुनिष्ठ इतिहासकार होते.

संदर्भसुची :


१. डॉ.प्रभाकर देव - इतिहास एक शास्त्र- कल्पना प्रकाशन नांदेड-आवृत्ती २००२, पान क्र.१२,१३
२. डॉ.अनिल सिंगारे-१०-११ फेब्रुवारी २०१०-दयानंद महाविद्यालय लातूर राष्ट्रीय चर्चासत्र प्रास्ताविक-द्वितीय सत्र अध्ययन ११ फेब्रुवारी २०१०
३. राजेन्द्र मोहन भटनागर- डॉ.बा.आ.चिंतन और विचार-सरस्वती प्रकाशन गांधीनगर दिल्ली-प्रथम संस्करण १९९२ पान क्र.१३,२३
४. प्रा.प्रशांत देशमुख-इतिहासाचे तत्वज्ञान-पिंपळापुरे प्रकाशन, औरंगपुरा औरंगाबाद.
५. अनु.मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष-न्या.म.गो.रानडे-म.रा.सा. आणि सं.मं.महाराष्ट्र राज्य मुंबई प्रथमावृत्ती मार्च १९९३ पान क्र.३,७,१०
६. संपादीत-नागोराव कुंभार-न्या.भ.गो.रानडे-प्रबोधनप्रकाशन लातूर प्रथमावृत्ती -मार्च १९९३ पान क्र.३५, ४२
७. उपरोक्त-(प्रशांत देशमुख)
८. डॉ.अनिल सिंगारे - इतिहासकार डॉ.बा.आंबेडकर
९. म.फुले समग्र वाङमय - म.रा.सा. आणि सं.मंडळ मुंबई-१९९१ चौथी आवृत्ती पान ६७१
१०. वसंतमुन-डॉ.बाबासाहेब आंबेडकर-टायटींग अँड रिसर्च खंड १७-एज्युकेशन डिपार्टमेंट गोर्टनमेन्ट ऑफ महाराष्ट्र बॉम्बे पान क्र.१३, ३५०, ३७३
११. न.म.जोशी-हिंदुत्वातील कुटप्रश्न-रघुवंशी प्रकाशन शुक्रवार पेठ पुणे पान क्र.१६
१२. डॉ.बा.आंबेडकर लिखित-शुद्र मुळचे कोण होते-सुधीर प्रकाशन वर्धा-पान क्र.३० उपरोक्त पान क्र. ३१, ४७
१३. मोरवंचीकर - प्राचीन भारताचा इतिहास
१४. डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर - प्राचीन महाराष्ट्र- वर्धा बुक्स-सेनापती बापट मार्ग पुणे - १९८९ पा.क्र.५४
१५. उपरोक्त
१६. डॉ.अनिल सिंगारे- चर्चासत्र प्रास्ताविक ११ फेब्रुवारी २०१० (दयानंद महाविद्यालय लातूर)
१७. डॉ.वि.गो.खोबरेकर-महाराष्ट्राचा इतिहास (मराठा कालखंड) म.रा.सं.आणि मंडळ मुंबई-प्रथमावृत्ती १९८८ पान क्र.३, २१
१८. गायकवाड व इतर - मराठेकालीन संस्था व विचार-फडके प्रकाशन कोल्हापूर-तृतीया वृत्ती १९९० पान क्र.१४८, १४९, १५०
१९. अनिल सिंगारे - राष्ट्रीय चर्चासत्र ११ फेब्रुवारी २०१०
२०. अनिल सिंगारे - राष्ट्रीय चर्चासत्र ११ फेब्रुवारी २०१०
२१. अनिल सिंगारे - राष्ट्रीय चर्चासत्र ११ फेब्रुवारी २०१०
२२. एच.एल.कोसारे-प्राचीन भारतातील नाग-ज्ञानदीप प्रकाशन नागपूर-प्रथमावृत्ती-१९८९ पान क्र.१, २
२३. डॉ.दिनेश हेरलेकर-डॉ.आंबेडकरांचे विरोधक -आनंदप्रकाशन जयसिंगपुरा, औरंगाबाद प्रथमावृत्ती २६ जा.१९८ पान क्र.९.१७
२४. रामनाथ चव्हाण-जाती जमाती-मेहता प्रकाशन, पुणे, पान क्र.१४, १५


□ □ □